Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XII Issue – II March - April 2023

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठात येणाऱ्या अडचणी : एक अभ्यास

डॉ. राकेश अशोक रामराजे
*सहाय्यक प्राध्यापक*
*पी.व्ही.डी.टी. कॉलेज ऑफ एज्यूकेशन फॉर वूमेन,*
*चर्चगेट, मुंबई 20.*

*सारांश :*

*विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये शिक्षणाचा वाटा हा फार महत्त्वपूर्ण ठरतो. राष्ट्र प्रगती किंवा राष्ट्र निर्माणाच्या कार्यात शिक्षकाची भूमिका फार महत्त्वपूर्ण आहे. राष्ट्र निर्मितीचा शिल्पकार म्हणून शिक्षकाकडे पाहिले जाते. शिक्षकाची एक चूक अनेक पिढ्या बरबाद करू शकते. शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे शिक्षक घडविण्याचे काम करतात. परिणामकारक शिक्षक घडविण्यासाठी शिक्षक प्रशिक्षणा अंतर्गत निरनिराळे उपक्रम राबविले जातात. या सर्व बाबी महाविद्यालयातून त्यांना मार्गदर्शनाच्या स्वरुपात मिळत असतात. संबंधित संशोधनामूळे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठात येणाऱ्या अडचणी कोणत्या आहेत हे निदर्शनास येणे शक्य होणार आहे.*

Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

मुख्य परिभाषा – शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सराव पाठ

## 1. प्रास्ताविक

शिक्षकाकडे अध्यापन कौशल्य असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी अध्यापन विषयाचे ज्ञान आत्मविश्वास, सर्व सूक्ष्म अध्यापनाचे कौशल्य या सर्व बाबी विद्यार्थी शिक्षकाकडे आवश्यक असतात व प्रशिक्षणात शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सराव पाठ यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात सराव पाठातून प्रशिक्षित शिक्षक अध्यापनासाठी तयार होतो.

## 2. समस्या विधान

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठात येणाऱ्या अडचणी : एक अभ्यास

## 3. पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या

1. **शिक्षणशास्त्र महाविद्यालय** – पदवी किंवा पदव्युत्तर पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण प्रशिक्षण देणारे महाविद्यालय .
2. **विद्यार्थी** – शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थी शिक्षक.

3. **सराव पाठ** – शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना केलेले अध्यापन.

4. **संशोधनाची उद्दिष्टे**

1. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सराव पाठात येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
2. विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठातील अडचणींवर उपाय योजना सुचविणे.

5. **संशोधनाची गृहितके**

1. विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठ टाचण लेखनात अडचणी येतात.
2. विद्यार्थी शिक्षकांना प्रत्यक्ष वर्गावर पाठ घेताना अडचणी येतात.

6. **संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

1. प्रस्तुत संशोधन हे मुंबई परिसरातील तीन शिक्षणशास्त्र महाविद्यालय पुरतेच मर्यादित आहे.
2. प्रस्तुत संशोधनासाठी महाविद्यालयाची निवड सप्रयोजन पद्धतीने केलेली आहे.

**मर्यादा**

1. सबंधित संशोधन फक्त शिक्षणशास्त्र महाविद्यालय पुरतेच मर्यादित आहे.
2. सदर संशोधनात फक्त सराव पाठांचाच विचार केलेला आहे.

7. **प्रत्यक्ष कार्यवाही**

प्रस्तुत संशोधनाचे कार्यक्षेत्र म्हणजे मुंबई जिल्ह्यातील तीन शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची निवड सप्रयोजन पद्धतीने करून प्रत्येक महाविद्यालयातील 4 प्राध्यापक व 5 छात्रअध्यापक असे एकूण 20 प्राध्यापक व 25 विद्यार्थी शिक्षकांची निवड करण्यात आली. प्राध्यापक व विद्यार्थी शिक्षक यांच्याकडून उद्दिष्टानारूप बनविण्यात आलेली प्रश्नावली भरून घेण्यात आली. त्याद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून अर्थनिर्वचन करण्यात आले त्यासाठी सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात आला व शेवटी निष्कर्ष व शिफारसी मांडण्यात आल्या.

**विद्यार्थी प्रतिसाद सारणी**

| अ. क्र. | प्रश्न विवरण | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद भारांश |
|---|---|---|---|
| 1 | सराव पाठाचे कृती सत्र आठ दिवस घेणे. | 16 | 80 |
| 2 | सराव पाठ तीन टप्प्यात पूर्ण करणे. | 15 | 75 |
| 3 | दररोज प्रत्येकाचे दोन पाठ लावणे. | 14 | 70 |
| 4 | दिग्दर्शनासाठी दरवर्षी तोच घटक घेणे. | 11 | 55 |
| 5 | वर्गात थोडेसे बसून निरीक्षण करणे. | 16 | 80 |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | सर्व विषयाचे निरीक्षण करणे. | 15 | 75 |
| 7 | उद्दिष्टे/स्पष्टीकरणे लिहीण्यात अडचणी येणे. | 12 | 60 |
| 8 | वर्षभराच्या शेवटी याद्या भरणे. | 13 | 65 |
| 9 | दररोज एकच पाठ लावणे. | 14 | 70 |
| 10 | कृती सत्राचे आयोजन करणे. | 11 | 55 |
| 11 | विषयज्ञान वाढवणे. | 16 | 80 |
| 12 | प्रत्येक पायरी समजावून सांगणे. | 12 | 60 |
| 13 | सूक्ष्म अध्यापन तंत्र विकसित होणे. | 13 | 65 |
| 14 | आदर्श दिग्दर्शन पाठ घेणे. | 14 | 70 |

**शिक्षक प्रतिसाद सारणी**

| अ.क | प्रश्न विवरण | प्रतिसाद संख्या | प्रतिसाद प्रभाग |
|---|---|---|---|
| 1 | सर्व वर्गात सामुहिक माहिती देणे. | 20 | 80 |
| 2 | सराव पाठाचे दिग्दर्शन विषय शिक्षकांकडून प्रतिसाद देणे. | 18 | 72 |
| 3 | पाठ दोन टप्प्यात पूर्ण करणे. | 17 | 68 |
| 4 | एका वेळेस भिन्न शाळा घेणे. | 19 | 76 |
| 5 | निरीक्षणासाठी एका वेळी एक शिक्षक असणे. | 14 | 56 |
| 6 | सराव पाठांची वर्गात सर्व विद्यार्थ्यांना माहिती देणे. | 15 | 60 |
| 7 | उद्दिष्टे स्पष्टिकरणे लिहीण्यात अडचणी येणे. | 18 | 72 |
| 8 | नमुना टाचण दाखवूण मार्गदर्शन करणे. | 15 | 60 |
| 9 | वर्ग नियंत्रण करण्यात अडचणी येणे. | 19 | 76 |
| 10 | वर्गात थोडा वेळ बसून निरीक्षण करणे. | 13 | 52 |
| 11 | बाहेरुनच निरीक्षण करण्यात येणे. | 07 | 28 |
| 12 | त्रुटी तोंडी सांगणे . | 10 | 40 |
| 13 | अंदाजे टाचणावर लिहून प्रतिसाद देण्यात येणे. | 10 | 40 |

8. **निष्कर्ष – प्राध्यापक प्रतीसाद सारणी वरून**

1. 65 टक्के प्राध्यापकांचे मत आहे की सराव पाठाचे कृती सत्र आठ दिवस घेतले जाते.
2. 55 टक्के प्राध्यापकांच्या मते सराव पाठ तीन टप्प्यांत पूर्ण केले जातात.
3. 65 टक्के प्राध्यापकांच्या मते प्रत्येक विद्यार्थी शिक्षकाचे दररोज दोन पाठ लावले जातात.

4. 70 टक्के प्राध्यापक नमुना पाठ दिग्दर्शनासाठी दरवर्षी तोच घटक घेतात.
5. 70 टक्के प्राध्यापक पाठ चालू असताना वर्गात थोडेसे बसून निरीक्षण करतात.
6. 75 टक्के प्राध्यापक सर्व विषयांचे पाठाचे निरीक्षण करतात.
7. 85 टक्के प्राध्यापक सर्व विषयाचे पाठाचे निरीक्षण करतात.
8. 55 टक्के प्राध्यापक सराव पाठाचे मूल्यमापन वर्षभराच्या शेवटी याद्या भरून करतात.
9. सराव पाठ विद्यार्थी शिक्षकाचा चांगला होण्यासाठी 80 टक्के प्राध्यापकांच्या मते प्रत्येकाचा दररोज एकच पाठ लावा 75 टक्के पध्यापकांच्या मते विद्यार्थी शिक्षकाचे विषयज्ञान वाढवावे
10. 80 टक्के प्राध्यापकांच्या मते विद्यार्थी शिक्षकांना पाठ लेखनात अडचणी येऊ नयेत म्हणून जास्तीत जास्त नमुना पाठ दाखवावे व प्रत्येक पायरी समजावून सांगावी.
11. 80 टक्के प्राध्यापकांच्या मते विद्यार्थी शिक्षकांचे चांगले सराव पाठ होण्यासाठी त्यांच्यात सूक्ष्म अध्यापन तंत्र व सेतू पाठ चांगले होणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष – विद्यार्थी शिक्षकांचा प्रतीसाद सारणी वरून**

1. 68 टक्के विद्यार्थी शिक्षकांच्या मते सराव पाठाचे माहिती सर्व वर्गात सामायिक दिली जाते
2. 80 टक्के विद्यार्थी शिक्षकांच्या मते विषय शिक्षकाकडून सराव पाठाचे दिग्दर्शन केले जाते
3. 72 टक्के विद्यार्थी शिक्षकांच्या मते सराव पाठ दोन टप्प्यात पूर्ण केले जातात
4. 48 टक्के विद्यार्थी शिक्षकांच्या मते एका वेळेस सरासरी तीन शाळा घेतल्या जातात
5. 52 टक्के विद्यार्थी शिक्षकांच्या मते एका शाळेवर एकच शिक्षक असतात
6. 72 टक्के विद्यार्थी शिक्षकांना उद्दिष्टे स्पष्टीकरणे लिहिण्यात अडचणी येतात
7. 52 टक्के विद्यार्थी शिक्षकांच्या मते नमुना टाचण दाखवून प्राध्यापक टाचण लेखनाचे मार्गदर्शन करतात
8. 76 टक्के विद्यार्थी शिक्षकांना सराव पाठ घेताना वर्ग नियंत्रण करण्यात अडचणी येतात
9. 60 टक्के विद्यार्थी शिक्षकांच्या मते सराव पाठाचे निरीक्षण शिक्षक वर्गात थोडेसे बसून करतात तर 36 टक्के शिक्षक बाहेरून निरीक्षण करतात
10. 40 टक्के विद्यार्थी शिक्षकांच्या मते सराव पाठातील त्रुटी तोंडी सांगितल्या जातात व टाचनावर अंदाजे लिहून सांगितल्या जातात

## 9. शिफारशी

1. प्रत्येक विद्यार्थी शिक्षकाचा दररोज एकच पाठ लावण्यात यावा
2. प्राध्यापकांनी वर्गात पूर्णवेळ बसून निरीक्षण करावे त्या त्या वेळीच मूल्यमापन करावे
3. पाठाचे निरीक्षण विषय शिक्षकाने करावे
4. पाठ लेखन आतील सर्व मुद्द्यांची सखोल माहिती द्यावी

10. संदर्भसूची


1. अकोलकर, ग. वि. (1990). *शैक्षणिक तत्वज्ञानाची रुपरेषा,* पुणे : श्री विद्या प्रकाशन.
2. बापट, भा. गो. (1995). *शैक्षणिक संशोधन,* पुणे : नूतन प्रकाशन.
3. भावे. भु., (2014). *शिक्षण आणि समाज – निर्मिती,* साधना प्रकाशन : नागपूर.
4. बहिरट, सा. गौ. (2012), *शिक्षण तरंग,* नाशिक : इनसाईट पब्लिकेशन.
5. भांडारकर, प्र. ल. वैद्य, नी. स., (1986), *समाजशास्त्रीय सिध्दांत,* नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ निर्मिती मंडळ.
6. भिंताडे, वि. रा. (2005). *शैक्षणिक संशोधन पद्धती,* पुणे : नुतन प्रकाशन.
7. दूधे, मा. रा. (2003). समाज आणि शाळा पुरक नाते, *शिक्षण संक्रमण,* जानेवारी–2003, पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
8. देसले, एस्. वाय्., आणि भदाणे, एम्. ए. (2009). *शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र,* नाशिक : रेशमाई प्रकाशन.
9. दाणी सु., (2018), *तुम्ही आम्ही पालक,* पुणे : सर फाऊंडेशन प्रकाशन.
10. दांडेकर, वा. ना. (2007). *शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र,* पुणे : श्रीविद्या प्रकाशन.
11. देव, न., आणि कुलकर्णी, अ. (22013). *शैक्षणिक संशोधन,* पुणे : नित्यनूतन प्रकाशन.
12. जाधव, के. के., कापडणीस, आर. एन. (2005), *आधुनिक भारतीय शिक्षणाचे समाजशास्त्र,* नाशिक : मन प्रकाशन.